# पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल २०१२–१३

## अनुक्रमणिका


**१. संकल्पना** **१–५**

१.१ अहवालाची ओळख

१.२ कार्यपध्दती

१.३ अहवालाची आवश्यकता

**२. पर्यावरण कार्यप्रवणता निर्देशांक** **६–१७**

२.१ शहराची वाढ

२.२ शहरातील संसाधनाची सद्य:स्थिती

२.३ शहराच्या पायाभूत सुविधा

२.४ शहराने पर्यावरण संवर्धनासाठी घेतलेला पुढाकार

२.५ पुणे शहराचा पर्यावरण कार्यप्रवणता निर्देशांक

**३. शहरवाढीला चालना देणारे घटक** (D = Driving Forces) **१८–२९**

३.१ लोकसंख्यावाढ

३.२ शहराचा आर्थिक विकास

३.३ शहरीकरण

३.४ शासनाचे विकासाभिमुख धोरण

**४. ताण (**P = Pressure) **३०–४९**

४.१ नैसर्गिक साधन संपत्तीवरील ताण

४.२ नागरी सुविधांवरील ताण

४.३ जमिनीचा वापर

**५. सद्यःस्थिती (**S = Status) **५०–८०**

५.१ हवा

५.२ पाणी

५.३ ऊर्जावापर – कार्बन फूटप्रिंट

५.४ ध्वनी

५.५ जैवविविधता

**६. परिणाम** (I = Impacts) **८१–८७**

६.१ मानवी आरोग्यावर होणारे परिणाम

६.२ जैवविविधतेवरील परिणाम

६.३पर्यावरणीय घटकांवरील परिणाम

**७. प्रतिसाद** (R = Responses) **८८–१२९**

७.१ उपचारात्मक कार्यपध्दती

७.२ प्रतिबंधात्मक कार्यपध्दती

७.३ अंगिकृत उपाययोजना

७.४ धोरणामध्ये अमूलाग्र बदल

**८. पर्यावरणीय दृष्टीक्षेपातून अर्थसंकल्प २०१३–१४** **१३०–१३५**

**९. परिशिष्ट** **१३६–१७३**

* * *

# <u>घोषणा पत्र</u>

- सदर अहवाल, पुणे महानगरपालिका, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., प्रादेशिक परिवहन कार्यालय, दैनिक वर्तमानपत्रे, प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी तसेच इतर नमूद केलेल्या स्त्रोतांद्वारे मिळालेल्या माहितीवर आधारित आहे.
- सदर अहवालात विविध शासकीय, निमशासकीय, अशासकीय संस्था, वैज्ञानिक संस्था, इ. कडून तसेच विविध संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल २०१२–१३ तयार करण्यात आला आहे. सदर माहितीचा उल्लेख संदर्भासहित योग्य ठिकाणी करण्यात आला आहे.
- सदर अहवालामध्ये नमूद केलेले कुठलेही नकाशे किंवा अवकाशीय छायाचित्रण मोजमापात (टू द स्केल) दिलेले नसून केवळ अंदाज येण्याच्या दृष्टीने वापरण्यात आले आहेत.

* * *

# प्रस्तावना

पर्यावरण आणि मानवी जीवन ह्या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा व त्यामधील बदलांचा अभ्यास करणे हे आपल्या सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा असलेल्या पुणे शहराचा शाश्वत विकास करून पुणे शहर हे पर्यावरणपूरक शहर बनविण्याच्या दृष्टीने शहराचा पर्यावरणीय अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. त्यासाठी भारताच्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक पर्यावरणाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ अ अन्वये प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने मागील आर्थिक वर्षाचा पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल सादर करणे बंधनकारक केले आहे.

पुणे महानगरपालिका गेली १६ वर्षे अखंडितपणे पुणे शहराचा पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल तयार करत आहे. मागील वर्षापासून हा अहवाल नागरिक, शहरातील स्वयंसेवी संस्था, माननीय नगरसेवक तसेच महानगरपालिका व शासनाचे विविध अधिकारी या सर्वांच्या सहभागातून अधिकाधिक सर्वसमावेशक बनविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सन २०१२–१३ च्या या अहवालासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यशाळांविषयी वेळोवेळी वर्तमानपत्रांमध्ये तसेच सोशल नेटवर्किंग साईट इ.च्या माध्यमातून सर्वांना आवाहन करण्यात आले होते. या कार्यशाळांद्वारे उपस्थितांनी दिलेल्या अमूल्य सूचना तसेच तज्ञांच्या मार्गदर्शनाचा या अहवालामध्ये समावेश करुन सन २०१२–१३ चा पुणे शहराचा पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल सादर करीत आहोत.

शहराचा विकास अधिकाधिक पर्यावरणपूरक व्हावा तसेच शहरातील प्रदूषण व पर्यावरणीय समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून पुणे महानगरपालिका सदैव प्रयत्नशील आहे.

महेश पाठक

महापालिका आयुक्त,

पुणे महानगरपालिका

* * *